# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २१५-२३** **दिनांक :- १०/०७/२०२३**

## Part Time Job च्या नावाने करण्यात आलेली फसवणूक रक्कम ०१,०५,८२५/- रुपये परत करण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!!

मिरारोड पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे इसम नामे श्री. दिनेश यांना पार्ट टाईम जॉबबाबत मोबाईल फोनवर एस.एम.एस. प्राप्त झाला. नमूद एसएमएस मधील मोबाईलवर फोन केला असता समोरील व्यक्ती अमॅझोन कंपनीची अधिकृत नोकरदार असल्याचे बतावणी करुन पार्ट टाईम जॉब देण्याचे सांगून त्यांची वैयक्तीक माहिती भरण्यास सांगून सुरवातीला काही रक्कम देवून विश्वास संपादन केला. तदनंतर त्यांना वेगवेगळया चार्जेस करीता टास्क देवून ०१,०५,८२५/- रुपयाची फसवणूक केलेबाबतची तक्रार सायबर गुन्हे कक्षास दिनांक १०/०९/२०२१ रोजी प्राप्त झालेली होती.

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. तक्रारदार यांचे फसवणूक रक्कम **ICICI Bank** चे खात्यावर गेल्याचे निष्पन्न झाल्याने तात्काळ पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन नमूद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली. तसेच सदरचा प्रकार मा. न्यायालयाचे निदर्शनास आणून देण्यात आले व मा. न्यायालयाचे आदेशानूसार तक्रारदार यांची फसवणूक झालेली ०१,०५,८२५/- रुपयांची रक्कम पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Unknown Link, Email वर क्लिक करु नये.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करु नये.**
- **अशा फसव्या एमएसएसला प्रतिसाद देवू नका. त्याची विश्वासर्हता पडताळून घ्यावी.**
- **कोणत्याही अनोळखी कॉल आल्यास त्याची विश्वासर्हता पडताळणी करुन घ्यावी.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे कक्षाचे पो.नि. श्री. सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि. स्वप्नील वाव्हळ, पो.उप.नि. प्रसाद शेनोळकर, स.फौ. संतोष चव्हाण, म.पो.हवा. माधुरी धिंडे, पो.अंम. गणेश इलग, प्रविण आव्हाड, पल्लवी निकम, अमिना पठाण, सुवर्णा माळी, कुणाल सावळे यांनी केली आहे.

सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५
सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

----0000----